महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित
**महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प पुणे**
**प्रकल्प व्यवस्थापन कक्ष**
३८६/२, १० वा मजला, शारदा चेंबर्स, शंकरशेठ रोड, पुणे ( महाराष्ट्र ) पिन ४११०३७
E-mail: projectadb@msamb.com फोन नं. ०२०-६७०६०००० 

जा.क्र.मॅग्नेट पीएमयु/का.आदेश/ म. लैं छळ प्र.म.निवारण/ ९३७ /२०२३ दि. २७ /१२/२०२३

वाचा: १) कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ मधील कलम ४ (ए)
२) महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.४८/मकक दि.०७/११/२०१३
३) MAGNET SOCIETY POLICY Document on PREVENTION, PROHIBITION AND REDRESSAL OF SEXUAL HARASSMENT AT THE WORKPLACE (POSH) Policy

**कार्यालयीन आदेश**

**विषय:- कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ ( प्रतिबंध , मनाई व निवारण ) अधिनियम २०१३ मधील तरतुदी अंतर्गत करण्यात आलेल्या तक्रार समिती बाबत ....**

कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ मधील तरतुदीनुसार व महिला व बालविकास विभागाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ,महिलांकडून आलेल्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी प्रत्येक कार्यालयांतर्गत तक्रार निवारण समिती गठीत करणे आवश्यक आहे. त्यास अनुसरून मॅग्नेट प्रकल्पाच्या प्रकल्प व्यवस्थापन कक्ष कार्यालयात कार्यरत असलेल्या महिलांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी खालीलप्रमाणे अंतर्गत तक्रार समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकारी-कर्मचारी नाव व पदनाम | समितीवरील पद |
|---|---|---|
| १) | श्रीमती संस्कृती पाटील, प्रकल्प अधिकारी, (GESI) | अध्यक्ष |
| २) | श्रीमती. ॲड. सुरेखा वाडकर | निमंत्रित सदस्य |
| ३) | श्री. कैलास कुंभार, उप प्रकल्प संचालक (वित्त व लेखा) | सदस्य |
| ४) | श्री.संतोष सिद्धेश्वर इंगोले ,(GESI Officer) | सदस्य |
| ५) | श्रीमती. अर्चना पिंपोडकर, प्रकल्प सहाय्यक (वित्त व लेखा) | सदस्य सचिव |

**सदर समितीची कार्यकक्षा व कामे पुढीलप्रमाणे असतील.**

१. समितीचे कार्यक्षेत्र मॅग्नेट प्रकल्प व्यवस्थापन कक्ष कार्यालयापुरते मर्यादित राहील.
२. सदर समितीची सभा वर्षातून दोनदा किंवा आवश्यक्तेनुसार घेण्यात येईल.
३. समितीने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहीत नमुन्यात शासनास सादर करण्यात येईल.
४. सदर समितीचा कार्यकाळ तीन वर्षांचा राहील.

**(विनायक कोकरे)**
**प्रकल्प संचालक,**
**मॅग्नेट प्रकल्प, पुणे.**

प्रति,

१)संबंधित अधिकारी /कर्मचारी, मॅग्नेट पीएमयु,पुणे
२)श्रीमती. ॲड. सुरेखा वाडकर

प्रत :

१. अति.प्रकल्प संचालक /उप प्रकल्प संचालक / प्रकल्प अधिकारी , पीएमयु,पुणे (सर्व)
२. विभागीय उप प्रकल्प संचालक, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (सर्व)